**Youth Festival 2023-24**

## युवारंग महोत्सवात आजचे कार्यक्रम

सोमवारी रंगमंच क्रमांक एकवर सकाळी ८.३० वाजता प्रहसन, बंदिस्त रंगमंच क्रमांक दोनवर ८.३० वाजता पाश्चिमात्य समूहगीत गायन, रंगमंच क्रमांक तीनवर वादविवाद स्पर्धा, रंगमंच क्रमांक चारवर ८.३० ते १२ वाजेपर्यंत पाश्चिमात्य गायन व दुपारी ३ वाजता पाश्चिमात्य वादन, रंगमंच क्रमांक पाचवर सकाळी ८.३० ते १२ वाजता कोलाज व दुपारी १२ ते ३ वाजता मातीकला आणि दुपारी ३ वाजता स्थळ छायाचित्र (प्रथम फेरी) या कला प्रकाराच्या स्पर्धा होतील असे आयोजन समितीतर्फे कळवण्यात आले आहे.

## राष्ट्रभक्तीचे चढले स्फुरण




युवारंग महोत्सवात विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीत सादर करून जाज्वल्य राष्ट्रभक्तीचा संदेश दिला.

# वराला मिळाली पसंती

## चे रंग : भारतीय व पाश्चात्य गायनाचे फ्युजन प्रभावी






### आज १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या स्पर्धा

**खुला रंगमंच क्र.१ वर (कवयित्री बहिणाबाई चौधरी रंगमंच)** सकाळी ८.३० वाजता लोकसंगीत व सकाळी १०.३० वाजता समुह नृत्य, **बंदिस्त रंगमंच क्र.२ वर (पद्मश्री ना.धो.महानोर रंगमंच)** सकाळी ८.३० वाजता भारतीय शास्त्रीय नृत्य, **बंदिस्त रंगमंच क्र.४ (भारतरत्न लता मंगेशकर रंगमंच)** सकाळी ८.३० वा भारतीय नाट्य संगीत, सकाळी १०.३० वाजता भारतीय सुगम संगीत, **रंगमंच क्र.५ वर (कलामहर्षी केकी मुस रंगमंच)** सकाळी ८.३० वा. इंस्टॉलेशन व स्थळ छायाचित्रण (अंतिम फेरी), सकाळी १०.३० वाजता पोस्टर मेकींग व रांगोळी या कला प्रकाराच्या स्पर्धा होतील.

## कामचालू वधुवर सूचक मंडळाने चुकवली अनेकांची संधी

रंगमंच क्र.१ कवयित्री बहिणाबाई चौधरी खुल्या रंगमंचावर दिवसभर प्रहसनाव्दारे प्रेक्षकांना विविध विषयांवर विचार करायला स्पर्धकांनी भाग पाडले. विविध क्लृप्त्या योजून हास्य निर्माण करणारे प्रहसन रसिकांना अंतर्मूख करीत होते. मणिपूर प्रकरण आणि महिलांवरील अत्याचार, सत्य-असत्याचा शोध, सोशल मिडीयाचे दुष्परिणाम, वाहतूकीचे नियम, राजकारण, शाकाहार आदी विविध विषय हाताळून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सादरीकरण केले. या स्पर्धेत १९ संघांनी भाग घेतला.

## पहाटे चारपासून सुरू होतो सराव

स्पर्धेत मेडल मिळवायचेच या उद्देशाने सर्वच स्पर्धक आलेले आहेत. काही स्पर्धे आपल्या कलेच्या सरावासाठी पहाटे चार वाजता उठून खुल्या रंगमंचावर सराव करत होते. तर काही रात्री उशिरापर्यंत जेथे शांतता असेल अशा ठिकाणी जात आपला सराव पक्का करत असल्याचे या परिसरात फेरफटका मारतांना दिसले.

त, ही ती. ची र्थक कडे र्थक ढत तरी चेत्र

# ते 'फिलींग' शब्दात नव्हे तर प्रत्यक्ष अनुभवावेच



मी प्रथमच युवारंगमध्ये सहभागी झाली आहे. आम्ही समुह गीत सादर केले आहे. समुह गीत सादर करताना वेगळेच फिल होत होते. ते शब्दात मांडता येणार नाही. पण खुप अनुभव आणि नविन अनुभवातून शिकायला मिळाले. या महोत्सवात सहभाग घेऊन छान वाटले. येथील सजावट व वातावरण खुपच भावले. यापुढे महाविद्यालयाने अशीच संधी द्यावी ही अपेक्षा.

- **प्रांजल बाबर**, नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव

# पहिलीच वेळ पण तयारी भक्कम



युवारंगमध्ये सहभाग घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. वादविवाद स्पर्धा व विडंबन या दोघांची वेळ एकत्र असल्याने तारांबळ उडाली. वाद विवाद स्पर्धेत पुर्वी आपल्या सहकाऱ्यासोबत दिलेल्या विषयावर अनुकुल किंवा प्रतिकुल वाद करावा लागत होता. मात्र, आता स्पर्धा दुसऱ्या गटातील स्पर्धकाशी असल्याने हा निर्णय योग्य वाटतो.

- **अदिती वाणी**, नूतन मराठा महाविद्यालय, जळगाव